# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

जानेवारी - एप्रिल २०२१ वर्ष १४ अंक १ पृष्ठ ८ रु. २/-

## प्रेम म्हणजे विचार नव्हे

**ती** दरी पूर्व-पश्चिम पसरली होती. तिचा पूर्वभाग निमुळता होत गेला होता व तिथे एक घळ तयार झाली होती. त्या दरीशेजारचा पर्वत सहा हजार फूट उंचीचा आहे. त्यावर ऊन पडले की लांब लांब सावल्या पडतात आणि तेथे असीम शांती असते. तिथे एक पुरातन ओक वृक्ष आहे; तो कित्येक शतकांचा जुना आहे. त्यावर सकाळचे ऊन पडते आणि तो सोनेरी दिसतो. तो अगदी अचल आहे. अगदी शेंड्यावरचे पानही आपल्या स्तब्धतेत श्वास रोखून आहे. एक कबूतर सकाळीच तिथे येते व आपले वैशिष्ट्यपूर्ण कोमल-दीर्घ कूजन करू लागते नि त्याची मादी त्याला साद देते; आणि दिवसाला सुरुवात होते. वसंतारंभाची ती पहाट. त्यावेळी संधिप्रकाशात खडकाळ डोंगर आणि गर्द वृक्षांनी भरलेल्या टेकड्यांच्या रांगांनी क्षितिजरेषा तयार झाली होती. आता एका श्रृंगी घुबडाचा घुत्कार थांबला होता. सूर्योदयापूर्वी त्या साऱ्या प्रदेशावर शांतीचे साम्राज्य पसरले होते. त्यावेळी विशाल आणि कालातीत धरित्री किती सुंदर दिसत होती. ही वसुंधरा आपली आहे, आपली सर्वांची आहे. कोणत्याही एका गटाची, जातीची किंवा राष्ट्राची नाही. ती आपल्या सर्वांची आहे, प्रत्येकाची आहे

टेकड्यातील चढावाचा रस्ता पक्का बांधलेला आहे. गुळगुळीत, रुंद आहे आणि फारशी अवघड वळणे त्याला नाहीत. वाटेत रस्त्याच्या दोही बाजूस दऱ्याखोऱ्यातून आणि डोंगरउतारांवरून नीट राखलेल्या संत्र्याच्या बागा आणि ॲव्होकॅडोच्या अगणित वाटिका मैलच्या मैल पसरलेल्या होत्या. एवढ्या लागवडीला पाणीपुरवठा करून काळजी घ्यावी लागते. खोऱ्यामध्ये सर्वत्र संत्र्यांचे बहर आणि ॲव्होकॅडो यांचा गंध भरून राहिला होता. हा रस्ता सर्वात उंच, बहुधा पाच हजार फुटांपर्यंत चढतो आणि ते ठिकाण पार करून हळूहळू खाली वाळवंटाकडे उतरतो. रस्त्याच्या त्या उंचावरच्या ठिकाणी आमची मोटार थांबली. तेथून दक्षिणेकडे उंच विशाल टेकड्या घनदाट वृक्षांनी आणि झुडुपांनी, जांभळ्या व पिवळ्या फुलांनी बहरलेल्या फुलझाडांनी पार झाकून गेल्या होत्या, तर उत्तरेला एकही झाड नव्हते. सारा प्रदेश वैराण होता. खडकाळ - विस्तृत क्षितिजापर्यंत एकसारखा! कोणीही अजिबात खराब न केलेला असा होता. त्यातील प्रत्येक खडक हजारो वर्षे तेथेच त्याच स्थितीत होता. प्रचंड अवकाश आणि अप्रमेय शांतता!

एकांत वेगळा आणि एकटे असणे वेगळे. एकांत हा आपल्याला बाजूला टाकले गेले तर नको असलेली गोष्ट - असा असू शकतो किंवा कशापासून तरी पलायनामुळे आलेला असतो. पण एकटे असणे, जिण्याचा भार मनावर नसताना संपूर्ण मुक्तपणे जेथे काळ आणि विचार यांचा शिरकाव होत नाही अशा प्रकारे एकटे असणे म्हणजे विश्वात्मक असणे होय! एकांतामध्ये अतिशय नैराश्याने भरलेला एकलकोंडेपणा असतो. आपल्याला लोकांनी टाकून दिले आहे, आपण समुद्रावर एखादे जहाज भरकटते तसे हरवलो आहोत. कुठेतरी, कोणाची तरी संगत लाभेल यासाठी तळमळत आहोत अशी भावना येते. आपल्या रोजच्या व्यवहारातून असाच एकाकीपणा येतो. त्यातच अंतहीन संघर्ष आणि दु:खे असतात आणि क्वचित काही आनंदाचे क्षण लाभतात. या एकाकी पडण्यातूनच भ्रष्टाचार अभिव्यक्त होतो. तो राजकारणात, उद्योगधंद्यात आणि संघटित धर्मातही दिसून येत असतो. भ्रष्टाचार हा अतिशय उच्च अधिकारपदावरही दिसतो आणि अगदी आपल्या उंबरठ्याशीही येतो. कशाशीही जखडले जाण्यातच भ्रष्टता असते. कोणत्याही प्रकारची आसक्ती भ्रष्टाचाराकडे नेते. मग ती आसक्ती विश्वास, श्रद्धा, आदर्श, अनुभव किंवा एखादा निर्णय यांच्याशीही असू शकते. मानसिक भ्रष्टता हा तर मानवी जीवनाचा सर्वसामान्य घटक झाला आहे. आंतरिक पातळीवर वासनांची जी वाढती भोगलालसा असते आणि वासनेच्या ऊर्मीभोवती विचार जी काल्पनिक प्रतिमा रचतो त्याच भ्रष्ट स्थितीची बाह्य पातळीवर उथळ प्रतिक्रिया पैशात, प्रतिष्ठेत व सत्तेत उमटते. भ्रष्टाचार हाच मुळी फुटीरपणा असतो.

निळे आकाश आणि पृथ्वीचे सौंदर्य या दोघांच्या दरम्यान विशाल अंतराळ होते, अवकाश होता. तेथेच जाणीव विराम पावत होती. त्या स्वच्छ हवेची, वाळवंटाच्या विशिष्ट गंधाची व दूरच्या फुलांच्या सुवासाची, तापलेल्या दगडावरच्या पालीच्या हालचालीची आणि अत्यंत खोल शांततेची साऱ्या इंद्रिय-संवेदनांना विलक्षण जागरूकतेने जाणीव होत होती. ती शांतता केवळ फार उंचीवर असणारी शांतता नव्हती, सूर्यास्तानंतर लगेच येणारी शांतता नव्हती किंवा पहाटेसच पृथ्वीवर, शहरांच्या व खेड्यांच्या गजबजाटापासून दूरवर एक शांतता अवतरते तीही नव्हती, तर त्याचबरोबर विचारांच्या गडबडीचा जिला कधीच स्पर्श झालेला नसतो ती शांतता तेथे होती. त्या शांतीला सीमा नसतात. ती एवढी निर्मल, शुद्ध व पवित्र असते की जाणीवेच्या सर्व हालचालीच्या ती फारच पलीकडे असते. तिथे काळ अक्षरश: थांबला होता.

आम्ही मोटारीने फळबागांच्या व राईच्या रस्त्यावरून उताराने जात होतो तेव्हाही ती शांती आमच्या सोबत आली होती. पुढे वस्ती चालू झाली. तिथे मानवाचा कमालीचा उत्तानपणा, पाशवी धावपळ, उद्दाम उद्धटपणा, जो तो आपलेच घोडे पुढे दामटतोय, धनदांडगे लोक आपली मुजोर सत्ता गाजवीत आहेत - अशी ती संस्कृती समोर आली

आणि ती मोटारगाडीही एकदम गप्प बसल्यासारखी झाली – त्याने काही फरक पडत नव्हता. एखाद्या मोठ्या शहरावर जर अणुबाँब फुटला तर त्याचा परिणाम काय होईल याचे तर्क तिथे सकाळच्या वृत्तपत्राच्या संपादकीय लेखात मांडले होते – लाखो लोक वाफ होऊन जातील, सारा समाज बेचिराख होईल वगैरे वगैरे. आणि तरीही माणसे राजकीय नेत्यांवर व सरकारवर विश्वास ठेवतात.

कोणीही विशेषज्ञ – मग तो शल्यविशारद असो, आर्चबिशप असो, स्वयंपाकी असो नाहीतर गवंडी असो – आपल्या मेंदूचा थोडासाच भाग वापरतो व मेंदूचे कार्य संकुचित करतो. मेंदूला असाधारण क्षमता आणि ऊर्जा आहे, पण राजकीय पुढारी काय किंवा एखादा गुरू काय, त्यातला अगदी थोडासाच भाग वापरतात. हे मेंदूचे कार्य आंशिक आहे व त्यानेच जगात मोठा गोंधळ माजविला आहे. सर्व धर्मांतले लोक जेव्हा वारंवार तेच तेच पूजापाठ करतात, अर्थहीन शब्दांचा जप करतात, दोन हजार ते पाच हजार वर्षांची परंपरा असलेले व संस्कारांनी त्यांच्यावर लादले गेलेले अविर्भाव करतात तेव्हा मेंदूचा थोडासा भागच काम करीत असतो. काही लोक ती सारी कर्मकांडे सुंदर वस्त्रे नेसून मोठ्या डौलाने करतात तर काही कशीतरी अव्यवस्थितपणे करतात. सरकारी गोटात तर भ्रष्टाचाराचे व सत्तेचे थैमान चाललेले असते. मेंदूचा हा अल्प भागही अमाप ज्ञान संचय करू शकेल, पण त्या ज्ञानानेच मेंदूचा एक भाग जास्त जड होतो, दृढ होतो. मानवाची उन्नती ज्ञानाच्या द्वारा कधीही होणार नाही कारण ज्ञान हे कधीही पूर्ण नसते. त्या ज्ञानापाठोपाठ अज्ञान सावलीसारखे जात असते. अतिशय झपाट्याने विकसित होणारा संगणक, ते अत्यंत चलाख यंत्र, जे सर्व तज्ज्ञ लोकांनी आत माहिती भरून रचलेले आहे ते मानवाच्या विचारावर व मंद प्रतिसादांवर कुरघोडी करील, त्यांना मागे टाकील, स्वत:च्या चुका स्वत:च दुरुस्त करील, स्वत:च्या समस्या स्वत:च सोडवील. मानवाने त्याच्या स्वत:च्याच भावनात्मक व मानसिक समस्यांपैकी एकही समस्या सोडविलेली नाही. फारच प्राचीन काळापासून त्याच्यावर त्या समस्यांचे ओझे आहे असे दिसते. शासनसंस्था, धर्म, परस्परव्यवहार, हिंसावृत्ती, युद्धे आणि पृथ्वीचे प्रदूषण या साऱ्या समस्यांना आपण अजूनही तोंड देत आहोत. जोपर्यंत मेंदूचा एखादाच भाग काम करीत आहे, जोपर्यंत 'तू अमेरिकन आहेस, तू ब्रिटिश, फ्रेंच आहेस' असे त्याच्या मनावर ठसविले गेले आहे, तसेच माणूस जोपर्यंत कॅथॉलिक, हिंदू किंवा मुस्लीम असा आहे तोपर्यंत त्या समस्या न सुटणाऱ्याच राहतील. आपला मेंदूचा विशिष्ट भाग किती संस्कारित, साचेबंदपणे पढविलेला झाला आहे, कार्यक्रमबद्ध आहे याचे आपल्याला अजिबात भानच नसते, असे दिसते. त्यामुळेच आपल्याला एक भ्रामक सुरक्षेची भावना मनात निर्माण झालेली असते. जणू रानटी माणसाच्या विरुद्ध असे ते आपले शाब्दिक संरक्षण असते. पण फक्त माणूसच खरा रानटी आहे. या जगात जो भ्रष्टाचार आहे आणि भयानक घटना घडत आहेत त्या सर्वांना तो स्वत:च कारणीभूत आहे. आज त्याच्याभोवती जे काही घडत आहे त्याला तो पूर्णपणे, सर्वस्वी जबाबदार आहे.

मेंदूचा हा एक छोटा भाग म्हणजे आपली जाणीव. ती जाणीव म्हणजे काळ, माप, स्थल–अवकाश आणि विचार यांचे आसन आहे. काळ हा शारीरिक व मानसिक दोन्ही दृष्टींनी उत्क्रांतीचा द्योतक आहे. सूर्य उगवणे आणि मावळणे हे त्यात येते. त्यात आपण कोणीतरी बनावे, ही भावना येते. माप म्हणजे 'जे आहे' ते आणि 'जे व्हावेसे वाटते' ते, यातील संबंध. एखादी आदर्श अवस्था गाठावयाची असते, हिंसावृत्ती हळूहळू शांत होईल अशी साधना असते, अविनाशी, नित्य असे काहीतरी तत्त्व प्राप्त करायचे असते, सतत कोणीतरी वेगळे बनण्याची प्रक्रिया असते, तसेच त्यात तुलना, अनुकरण, मिळतेजुळते घेणे येते. अधिक चांगले आणि अधिक प्रमाणात अशी मोजणी येते. स्थल–अवकाश म्हणजेच पृथ्वीची विशालता, आकाश, गर्दीच्या शहरातील छोटी जागा आणि असलीच तर मनांतील जागा, जाणीवेतील मोकळी जागा. इथे विचार हा मालक असतो. विचार हा मानवी जीवनात सर्वात प्रभावी घटक आहे. त्यात पौर्वात्य विचार व पाश्चात्य विचार असा भेद नसून फक्त विचार एवढाच केवळ सर्वत्र असतो. तो अनेकविध प्रकारे व्यक्त होत असला तरी ती सर्व गती, विचाराचीच असते. अगदी अत्यंत आदिवासी मानवापासून अत्यंत उच्च शिक्षण घेतलेल्या मानवापर्यंत साऱ्या मानवजातीचा, 'विचार' हाच समान घटक आहे. विचारानेच माणसाला चंद्रावर पाठविले आहे. विचारानेच ॲटम बाँब तयार केला आहे. त्यानेच सर्व देवळे, प्रार्थनामंदिरे, त्यातील तथाकथित पवित्र मानल्या गेलेल्या वस्तू, तसेच तपशीलवार कर्मकांड, सिद्धांत, मते, विश्वास, श्रद्धा हे सारे निर्माण केले आहे. त्याने संगणक आणि त्यातील कार्यक्रम तयार केला आहे. त्याने मानवाला असंख्य प्रकारांनी मदत केली आहे, पण त्याचबरोबर युद्धे आणि घातक शस्त्रास्त्रे निर्माण केली आहेत. त्यानेच आदर्श उभे केले आहेत. प्रचंड हिंसाचार, अनन्वित छळ केले आहेत आणि मानवजातीचे राष्ट्र, वर्ण, अनेक धर्म यानुसार भाग पाडले आहेत. त्यामुळे माणूस आपणच आपला वैरी व दुसऱ्याचाही वैरी झाला आहे. विचार, विचारमय स्मृती आणि विचाराने प्रक्षेपित केलेल्या प्रतिमा म्हणजे प्रेम नव्हे.

विचार हा जाणीवेला जिवंत ठेवतो व पुष्टी देतो. जाणीवेतील आशय म्हणजे एक अखंड गतिमान मालिका आहे. त्यात विचार, इच्छा, संघर्ष, भय, सुखाचा पाठलाग, वेदना, एकाकीपणा, दु:ख या गोष्टी येतात. प्रेम आणि अत्यंत निर्मल अशा प्रज्ञेसह असलेली अनुकंपा ह्या गोष्टी त्या मर्यादित जाणीवेच्या पलीकडे असतात. जाणीवेचे उच्च स्तर व नीच स्तर असे भाग पाडू नयेत कारण जाणीव म्हटली की ती एकच असते, आणि तिची सतत वटवट चालू असते. जाणीव म्हणजेच सगळा काळ, सगळे मोजमाप, सर्व अवकाश असतो. कारण जाणीव ही विचारजन्य असते. विचार हा केव्हाही, कोणत्याही परिस्थितीत 'पूर्ण' असू शकत नाही. 'काय परिपूर्ण आहे' याबद्दल तो तर्कवितर्क करू शकतो आणि त्याची अनुभूती व तिचे शाब्दिक वर्णन यात रमू शकतो. पण त्या नित्यतेचे सौंदर्य, त्याची अनंतता, तो आकलन करू शकत नाही.

याचे कारण असे की विचार हा अनुभव व ज्ञान यांचे वांझोटे अपत्य असते व अनुभव आणि ज्ञान या गोष्टी कधी परिपूर्ण असू शकत नाहीत. त्यामुळे विचार हा नेहमी खंडित व मर्यादितच असणार. ज्या समस्या विचाराने माणसासमोर उपस्थित केल्या आहेत त्या सोडविण्याचा प्रयत्न विचार हा स्वत:च करतो आणि त्यामुळेच त्या समस्या तो वाढत्या प्रमाणात चालूच ठेवतो. त्याने निर्माण केलेल्या समस्या व संघर्ष सोडविण्यास विचाराच्या अंगी अजिबात मानसिक बळ नाही हे जेव्हा विचाराला स्वत:च उमजते तेव्हा सत्यदर्शनाने व अंतर्दृष्टीने त्या समस्यांचा अंत होतो.

*गस्टाड्, स्वित्झर्लंड, ३ ऑगस्ट १९८१, बुलेटिन*

## संपादकीय


‘**आ**पत्ती अनेक प्रकारे येत असतात. काही मानवनिर्मित असतात, जसे उपासमार, युद्धे इ. काही निसर्गनिर्मित असतात, जसे धरणीकंप, वादळे, ज्वालामुखी वगैरे.

आपत्तीच्या व्याप्तीचे प्रमाण वेगवेगळे असते. आजचे जग जलद दळणवळणामुळे खूप जवळ आले आहे. म्हणून प्रत्येक बऱ्यावाईट घटनांचे परिणाम लहानमोठ्या प्रमाणात सर्व मानवजातीवर होतात आणि मग ती आपत्ती स्थानिक न राहता जागतिक होते.

त्या आपत्ती आपण बाह्य स्वरूपात पाहतो, पण कृष्णमूर्ती म्हणतात, बऱ्याच नैसर्गिक वाटणाऱ्या आपत्तींच्या मुळाशी मानवी जाणीवेतून निर्माण झालेला ‘मी’-‘अहं’ असतो.

हा ‘मी’ कसा निर्माण होतो? आणि तो जागतिक आपत्तीला कसा कारणीभूत होतो? हा एक प्रचंड अभ्यासाचा विषय होऊ शकतो. आपल्या तत्कालीक सोईसाठी आपण आपल्या भवतालाची, आपल्या वातावरणाची वाताहात करत असतो, स्वत:च्या सुखासाठी अनेकांचे हितसंबंध पायाखाली घालत असतो. आपल्या ध्येयवादासाठी युद्धे निर्माण करतो किंवा त्यांचे समर्थन करतो. आपल्या विलासी, चैनी जीवनशैलीच्या हव्यासापोटी आपले मनही विकृत होऊ लागते. अशाच एका विकृत लालसेपायी आजचा प्राण्यातील व्हायरस माणसात आला असाही एक मतप्रवाह आहे. हे सिद्ध होईल किंवा नाही पण ह्या जागतिक आपत्तीत माणसे व राष्ट्रे एकत्र येऊन उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करत आहेत आणि तिथेही त्याचे भांडवल करून आपला स्वार्थच साधण्याची मानसिकता स्पष्टपणे जाणवते. जागतिक आपत्तीला माणसाचा स्वार्थच कारणीभूत आहे.

## कृष्णमूर्तींनी त्यांच्या शाळांना लिहिलेली पत्रेः जीवनाची निरंतर वाटचाल हेच शिकणे




जे. कृष्णमूर्ती यांनी त्यांच्या शाळांना लिहिलेल्या इंग्रजी पत्रांच्या संकलनाचा हा मराठी अनुवाद पद्मगंधा प्रकाशनाने अलिकडेच प्रकाशित केला आहे. जे.कृष्णमूर्तींनी त्यांच्या शाळांतील शिक्षकांना तळमळीने व जिव्हाळ्याने लिहिलेली ७२ पत्रे या पुस्तकात समाविष्ट केली आहेत. कृष्णमूर्तींच्या जीवनदृष्टीच्या एक अभ्यासक श्रीमती वासंती पडते यांनी हा सुबोध सुंदर अनुवाद केला आहे.

या पत्रांमधून कृष्णमूर्तींची शिकवण, त्यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन, अशा प्रकारच्या जीवनदृष्टीसाठी आवश्यक असलेले अवधान, आत्मभान, स्वत:चे निरीक्षण करण्याची तयारी, निसर्गाशी तसेच स्वत:बरोबर व इतरांशी असलेले नातेसंबंध याचे मार्मिक विवेचन त्यांनी केले आहे.

संस्कृती, परंपरा म्हणजे काय, राष्ट्रवाद, धर्म, संस्कारबध्दता, स्वातंत्र्य, व्यवस्था-अव्यवस्था, शिक्षकांची व पालकांची जबाबदारी, परस्परसंबंध आणि नैतिकता या अत्यंत ज्वलंत प्रश्नांवर त्यांनी गंभीरपणे या पत्रांमधून भाष्य केले आहे. या सर्व संकल्पना, ज्या त्यांच्या शिकवणुकीचा गाभा आहे, त्या शिक्षकांना-पालकांना कशा समजावून देता येईल याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

मुलांना भीतीमुक्त वातावरणात त्यांच्यातील सुप्त क्षमतांना, कलागुणांना प्रोत्साहन देत त्यांच्यातील चांगुलपणा कसा फुलविता येईल, त्यांच्यामध्ये संवेदनशीलता, प्रज्ञा कशी जागृत करता येईल आणि हे सर्व शिक्षकांनी स्वत: समजून घेत असताना त्यांना मुलांशी त्याबद्दल संवाद कसा साधता येईल हे सांगण्याचा प्रयत्न त्यांनी या पत्रांमधून केला आहे.

अगदी पहिल्या पत्रामध्ये कृष्णमूर्ती लिहितात:

*मला भारतात असलेल्या शाळा, इंग्लंडमधील ब्रॉकवुड पार्क येथील शाळा, कॅलिफोर्नियातील ओहायमधील ओक ग्रोव्ह शाळा या सर्वांशी संपर्क ठेवावासा वाटतो. म्हणून जोपर्यंत शक्य असेल तोपर्यंत दर पंधरवड्याला या शाळांना एक पत्र पाठविण्याचा माझा विचार आहे ह्या पत्रांमधून ह्या शाळा कशा असाव्यात, शैक्षणिकदृष्टा त्या उत्तम असाव्यात पण त्याहूनही काही अधिक असाव्यात हे, ह्या शाळांना जे जबाबदार आहेत त्यांच्यापर्यंत मी पोहोचवू शकेन. एक संपूर्ण व्यक्तिमत्व घडवणे हा त्यांचा ध्यास असला पाहिजे. ह्या शिक्षणकेंद्रांनी विद्यार्थी आणि अध्यापक ह्यांना नैसर्गिकरित्या बहरण्यास मदत केली पाहिजे.*

ही पत्रे वाचताना पालक, शिक्षक, शिक्षणशास्त्राचे अभ्यासक आणि शिक्षणाविषयी आस्था वाटणाऱ्या अन्य व्यक्तींच्याही जाणीवा समृद्ध होतील. मराठी माध्यमाच्या शाळांतील ज्या शिक्षकांना अशा प्रकारच्या शिक्षणामध्ये रस असेल त्यांच्यापर्यंत हे पुस्तक पोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.


प्रकाशक : पद्मगंधा प्रकाशन, पृष्ठे : २५६, किंमत: रु. ३००/-

### आपल्याला शिक्षण का दिले जाते?

आपल्याला शिक्षण का दिले जाते? शिक्षण, आधीच्या पिढीने तयार केलेल्या साच्यात मन बसवण्यासाठी आहे की आपल्या विस्कळीत जीवनाची आतून बाहेरून संपूर्ण घडण समजून घेऊन त्या पलीकडे जाण्यासाठी आहे? ते फक्त ज्ञानार्जनासाठी आहे की अव्यवस्थेतून स्वत:ला मुक्त करण्यासाठी आणि म्हणून नवसमाज निर्मितीसाठी आहे?

*शाळांना लिहिलेली पत्रे;*
*जीवनाची निरंतर वाटचाल हेच शिकणे प्र. ६९*

# यु-ट्युब वाहिनी -जे. कृष्णमूर्ती - मराठी




https://www.youtube.com/channel/UCM1xTHghRqowwVnSfdUHQZQ

ह्या युट्यूब चॅनेलवर जे. कृष्णमूर्तींच्या भाषणांचे आणि संवादांचे काही व्हिडिओ मराठी उपशीर्षकांसह किंवा मराठी ध्वनीमुद्रणासह उपलब्ध करण्यात येत आहेत. ह्यातील बरेच व्हिडिओ हे संपूर्ण भाषणातील किंवा संभाषणातील एखाद्या विशिष्ट विषयावरील किंवा प्रश्नावरील उतारे आहेत. त्यामुळे ते सुमारे २० ते ३५ मिनिटांच्या अवधीचे आहेत.

The Real Revolution ही इंग्रजी मालिका येथे मराठी उपशीर्षकांसह उपलब्ध आहे. त्यातील विषय आहेत : यथार्थ क्रांती – कुठे चाललो आहोत आपण?, स्वयं-निरीक्षण करताना, भीतीपासून मुक्ती, ध्यान, प्रेम म्हणजे काय?, प्रश्न विचारताना..., जीवन-मृत्यू, संघर्षाचा अंत. कृष्णमूर्तींच्या भाषणांचे आणि संवादांचे व्हिडिओ पाहताना ह्या मूळ इंग्रजीतील ध्वनीमुद्रणांची उपशीर्षकं आपल्या मातृभाषेतून सहजपणे वाचण्याची ही एक विशेष संधी आहे. ह्या युट्यूब चॅनेलला जरूर भेट द्या.

## संकट 'या इथे' आहे

संकट 'या इथे' आहे. बाह्य जगात ते नाहीच; अण्विक संहार, सभवती चाललेली भीषण फाटाफूट, क्रूराचार हे खरं संकट नव्हे. संकट आपल्या आत आहे, आपण जे आहोत, जे बनलो आहोत तेच महासंकट आहे.

*मद्रास, २५ डिसेंबर १९८२; 'माइंड विदाउट मेजर'*

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,** वसंतविहार, १२४, १२६, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : ०४४०-२४९३७८०३/२४९३७५९६ • ईमेल : info@kfionline.org, vvstudy@kfionline.org • वेबसाईट : www.kfionline.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बेंगलुरू :** संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कँपस, १७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बेंगलुरू-५६००६२.
दूरध्वनी : ०८० – २८४३५२४३ • ईमेल : kfistudy@gmail.com • वेबसाईट : www.kfistudy.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, राजघाट- वाराणसी:** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, राजघाट फोर्ट, वाराणसी २२१ ००१.
दूरध्वनी: ०५४२ – २४४१२८९ / २४४०३२६ • ईमेल : studycentre@rajghatbesantschool.org • वेबसाईट : www.rajghatbesantschool.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री:** पोस्ट – तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा – पुणे, पिन – ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल : kfisahyadri.study@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, ऋषी व्हॅली:** जिल्हा चित्तूर, आंध्र प्रदेश – ५१७३५२ दूरध्वनी : : (०८५७१) २८०६२२/ २८०५८२, ९४९३५४७८२२/ ९४९३५४७३२२/७८९३६४४७१७/७८९३६४४४९७ • ईमेल : study@rishivalley.org • वेबसाईट : http://www.rishivalley.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, उत्तरकाशी:** पोस्ट रानारी, डुंडा ब्लॉक, जिल्हा उत्तरकाशी – २४९१५१. • ईमेल : krc.himalay@gmail.com
दूरध्वनी : ९४१२४ ३६४२९/९४१५९८३६९० • वेबसाईट : http://www.jkrishnamurtionline.org भारतीय भाषांमधील संकेतस्थळ

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कोलकाता:** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, ३०, देवदार स्ट्रीट, कोलकाता – ७०००१९.
दूरध्वनी : (०३३) ४००८२३९८ • ईमेल : kfikolkata@gmail.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, कटक:** ओरिसा, पुरीघाट रोड, तेलेंगा बझार, कटक – ७५३००९, ओरिसा.
दूरध्वनी : (०६७१) ६४१७९९० • ईमेल : kficuttackcentre@gmail.com • वेबसाईट : www.kficc.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर:** आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३. दूरध्वनी : (०२२) २६६००२२४, २४२२३१९९ • ई मेल : jksesbadlapur@gmail.com • वेबसाईट : www.jkses.org

# खरं खुरं संकट

इतिहास म्हणजे मानवाने ओढवून घेतलेल्या अरिष्टांची चालू बखरच म्हणावी लागेल. ही अरिष्टं, या विपत्ती असतात तरी कशा? - न चुकता पुन्हा पुन्हा घडणाऱ्या; आपल्याला नेहेमीच भयचकित करणाऱ्या, हादरवून टाकणाऱ्या; विशेषज्ञांचे, अभ्यासकांचे अंदाज बहुतांशी मोडीत काढणाऱ्या, बुद्धीच्या आडाख्यांना ठेंगा दाखवणाऱ्या, तर्क-प्रमाणाला न जुमानणाऱ्या... जगाला हतबुद्ध, अगतिक करून सोडणाऱ्या.

दोन अरिष्टांच्या मध्यंतरात आपण 'सामान्य जीवना'चा गाडा कसाबसा ढकलत रहातो. या तथाकथित 'सामान्य' जीवनात आपला वेळ व ऊर्जा असंख्य गोष्टींमधे खर्ची पडते - प्रांजळ चिकित्सा वगळता. साधारणतः मानवी अस्तित्वाचं व विशेषतः आपल्या जगण्याचं उद्देश्य काय, यावर आपण चिंतन करत नाही. 'आपली आजची जीवनरीत उद्याच्या वैश्विक महासंकटांचा पाया तर रचत नाही ना?' असा प्रश्न आपण विचारत नाही. हा प्रश्न मुळी आपल्याला पडतच नाही, आणि चुकूनमाकून पडला तर आपण त्याला सर्वांशाने भिडत नाही.

जे. कृष्णमूर्ती आपल्यापुढे नेमकं हेच आव्हान उभं करतात. आपल्याला ते कितीतरी मूलभूत प्रश्नांची जाणीव करून देतात. असे काही प्रश्न कृष्णमूर्तींनी जवळपास पाच दशकांच्या (१९३४ ते १९८५) दीर्घावधीत केलेल्या लेखन व जाहीर संवादांतून इथे उद्धृत करण्यात आले आहेत.

### कड्याच्या टोकावरील जीवनबंधांची पुनर्रचना

वर्तमान वैश्विक संकट केवळ अचाट आहे. भूतकाळात अशातऱ्हेचे उत्पात थोडकेच उद्भवले असावेत. मानवी जीवनात सर्वसामान्यपणे उद्भवणाऱ्या पेचप्रसंगांपैकी हे संकट नव्हे. ते भारतीय, युरोपीय वगैरे नसून जगाच्या कानाकोपऱ्यात हातपाय पसरत आहे. शारीरिक, मनोवैचारिक पातळीवर, नैतिक व आध्यात्मिक, आर्थिक व सामाजिक पातळ्यांवर पडझड होते आहे, सर्वत्र संभ्रमितता आहे. जणू कड्याच्या टोकावर आपण उभे आहोत आणि क्षुल्लक बाबींवरून भांडणतंटे करत आहोत. या वैश्विक संकटाचं गांभीर्य, त्याचं अगाध, प्रक्षोभक रूप, त्याची विस्मयजनक प्रकृती फारच थोड्यांच्या ध्यानात येत आहे. सार्वत्रिक गोंधळलेपण लक्षात घेऊन काहीजण कड्याच्या टोकावरील जीवनबंधांची पुनर्रचना करण्यात गुंतलेत, मात्र ते स्वतःदेखील गोंधळलेले असल्याने एकंदर गोंधळात आणखी भर पडते आहे.

मद्रास, २२ ऑक्टोबर १९४७;
'द कलेक्टेड वर्क्स', खंड चौथा

### यास तुम्हीच जबाबदार आहात

ही घोर आपत्ती कुठल्याशा आकस्मिक घटनेतून निपजली नाही; आपण सर्वांनी, आपल्यापैकी प्रत्येकानं तिला हातभार लावला आहे - आपल्या ईर्ष्या, लोभ, लालसायुक्त दैनंदिन उद्योगांतून; सत्तेच्या, वर्चस्वासाठीच्या आपल्या अभिलाषेतून; आपल्या स्पर्धात्मक निष्ठुरतेतून; वैषयिक (sensate) व अशाश्वत, अधीर जीवनमूल्यांमधून. दुसरं-तिसरं कोणी नव्हे, आपणच - तुम्ही व मी - या भयंकर दैन्यास, गडबडगुंत्यास जबाबदार आहोत. तुम्ही अविचारी, अनभिज्ञ आहात; आपल्याच आकांक्षा, सुखसंवेदनांच्या मागे बेभानपणे धावत आहात, तात्क्षणिक संतुष्टी देणाऱ्या मूल्यांमधे गुरफटलेले आहात; तुम्हीच हे महाकाय, सर्वव्यापी संकट पैदा केलं आहे. ....यास तुम्हीच जबाबदार आहात, अन्य कोणताही समूह वा व्यक्ती नव्हे, सर्वस्वी तुम्ही.

*मद्रास, २२ ऑक्टोबर १९४७;*
*'द कलेक्टेड वर्क्स', खंड चौथा*

### उच्चकोटीची बुद्धिमत्ता आणि फोल, रिकामं अंतःकरण

आधुनिक जग म्हणजे नेमकं आहे तरी काय? आधुनिक जगात सामूहिक यंत्रणा अधिकाधिक तंत्रकुशल, कार्यक्षम बनवल्या जात आहेत. तंत्रज्ञानात अफाट प्रगती होते आहे, सामूहिक गरजांची अपपूर्ती होते आहे, उत्पादनाची साधनं मोजक्याच लोकांच्या मुठीत आहेत. विविध राष्ट्रीयत्वं एकमेकांवर शिंगं रोखून आहेत, स्वायत्त राज्यसत्तांमुळे वारंवार युद्धं जुंपत आहेत. अशी या आधुनिक जगाची दशा आहे, नाही का? तांत्रिक प्रगतीच्या सोबतीने तितकीच महत्त्वाची मनोवैचारिक उन्नती मात्र घडत नाहीय, त्यामुळेच असमतोलाची अवस्था आहे. विज्ञानाची कामगिरी थक्क करून टाकते, मात्र त्याचवेळी मानवी व्यथेला अंत नाही, आपली हृदयं, आपली मनं रिती आहेत. ..तर असं हे आधुनिक जग, जे खुद्द तुम्ही आहात. जग तुमच्यापासून पृथक नाही. तुमचं जग - म्हणजेच तुम्ही स्वतः - उच्चकोटीची बुद्धिमत्ता आणि फोल, रिकामं अंतःकरण असं हे जग आहे.

*नवी दिल्ली, १४ नोव्हेंबर १९४८;*
*'द कलेक्टेड वर्क्स', खंड पाचवा*

### ...तर हळूहळू त्या जखमा भरून येतात

निसर्गाशी आपला किती कमी संबंध येतो हे कसं विचित्र वाटतं. पृथ्वीवरील सर्व जिवंत गोष्टींबद्दल आपल्याला आस्था असल्याचं दिसत नाही. आपण जर निसर्गाशी सखोल, कायमचा संबंध जुळवू शकलो तर आपल्या आहारासाठी आपण एखाद्या प्राण्याची हत्या कदापी करणार नाही. एखाद्या माकडाला, कुत्र्याला, गिनीपिगला आपल्या फायद्यासाठी आपण कधीही इजा करणार नाही, त्यांची चिरफाड करणार नाही. आपल्या जखमा, आपली शारीरिक इजा बऱ्या करण्यासाठी आपण दुसरे मार्ग शोधून काढू, पण मानसिक जखमा भरून काढणं ही एक संपूर्णपणे निराळी गोष्ट आहे. तुम्ही जर निसर्गाच्या सान्निध्यात असाल तर हळूहळू त्या जखमा भरून येतात.

*२५ फेब्रुवारी १९८३; कृष्णमूर्तींचा स्वतःशी संवाद*

### तुम्ही आणि जग ह्यामधील दरी

जेव्हा निसर्गाशी आपला संबंध सुटतो तेव्हा एकमेकांशी असलेला आपला संबंधही तुटतो. जेव्हा पक्ष्यांशी असलेला तुमचा संबंध, छोट्याशा घाबरट लाजाळू लावा पक्ष्याशी असलेला तुमचा संपर्क तुटतो तेव्हा तुमच्या बाळाशी असलेला तुमचा संबंध, रस्त्यापलिकडे असलेल्या माणसाशी असलेला संबंधही तुटतो. तुम्ही खाण्यासाठी एखादा प्राणी मारता तेव्हा तुम्ही संवेदनशून्यतेला वाव देत असता आणि अशी संवेदनशून्यता सीमेपलिकडच्या त्या माणसाला मारण्यासाठीही कारणीभूत ठरते. जेव्हा जीवनाच्या प्रचंड गतीशी तुमचा संबंध तुटतो तेव्हा तुम्ही सर्व नातेसंबंध गमावून बसता. तेव्हा तुम्ही, तुमचा अहं, त्याच्या चित्रविचित्र इच्छा, मागण्या आणि लक्ष्य ह्यांनाच सर्वात अधिक

महत्त्व दिलं जातं आणि मग अविरतपणे चालणाऱ्या संघर्षामुळे तुम्ही आणि जग ह्यामधील दरी अधिकाधिक रुंदावत जाते.

*'शाळांना लिहिलेली पत्रे - जीवनाची निरंतर वाटचाल हेच शिकणे',*
*प्रकरण ६७*

## संतुलन व सुसंगतीचं अतीव सौंदर्य

तुम्ही जेव्हा सभोवताली पाहता, आपल्या मानवी जगात फारसं नाही, पण निसर्गाचं अवलोकन करता, तेव्हा तुम्हाला अतिविलक्षण संतुलन, व्यवस्था आणि एकात्मतेची जाणीव होते. प्रत्येक झाड व फूल ह्यांना त्यांची स्वतःची व्यवस्था असते, स्वतःचं सौंदर्य असतं; प्रत्येक शिखराला, प्रत्येक दरीला त्यांच्या स्वतःच्या लयबद्धतेची, अचलतेची जाणीव असते. माणूस नद्यांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो आणि त्यांचं पाणी दूषित करतो, तरीसुद्धा नद्यांना त्यांचा स्वतःचा असा ओढ आणि दूरवर जाण्याची गती असतेच. माणसाव्यतिरिक्त इतर गोष्टींचा विचार केला तर सागरात, वातावरणात आणि आकाशाच्या विशाल अवकाशात एक विलक्षण शुद्ध व सुव्यवस्थित अस्तित्वाचा भाव असतो. कोल्हा जरी कोंबडीची पिल्लं खातो, मोठे प्राणी लहान प्राण्यावर जगतात ह्या गोष्टी क्रूर वाटल्या तरी, ही सुद्धा विश्वातील व्यवस्थेची योजनात्मक रचना असते. ह्या बाबतीत अपवाद आहे तो फक्त माणसाचा. जेव्हा माणूस ढवळाढवळ करीत नाही तेव्हा तिथे संतुलन व सुसंगतीचं अतीव सौंदर्य असतं.

*'शाळांना लिहिलेली पत्रे - जीवनाची निरंतर वाटचाल हेच शिकणे',*
*प्रकरण ७०*

## तुम्हाला हे टाळावंसं वाटेल...

या समस्त अस्तित्वाचा अर्थ काय? कदाचित तुम्हाला याकडे पाहण्याची इच्छा होणार नाही, तुम्हाला हे टाळावंसं वाटेल... आयुष्याची वीस-वीस, तीस-तीस वर्षं तुम्ही ज्ञान वेचता; भौतिकशास्त्र, भाषाशास्त्र, जीवशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, मनोविश्लेषण, मनोविकृतिशास्त्र इत्यादींचा अभ्यास करता, माहितीचं भंडार जमवता. या व्यापात तुम्ही वर्षामागून वर्षं खर्ची घालता, आपण कोण आहोत, काय आहोत, आपण असे का जगताहोत हे स्वतःच शोधून काढण्याकरता मात्र तुम्ही एक दिवस, एक तासदेखील देत नाही.

*आय.आय.टी. मुंबई, ७ फेब्रुवारी १९८४;*
*'व्हाय आर यू बीइंग एज्युकेटेड?'*

## विशेषज्ञ बनणं ही एक विखंडनाची प्रक्रिया आहे

आपण आपली आयुष्यं वाया घालवत आहोत का? 'वाया घालवणं' या शब्दाचा आपल्याला अभिप्रेत असलेला अर्थ आहे - विविध मार्गांनी आपल्या ऊर्जेचा अपव्यय करणं, विशेष प्रकारच्या व्यवसायांत ती खर्ची पाडणं. आपण आपलं संपूर्ण अस्तित्व, आपलं जीवन वाया घालवत आहोत का? तुम्ही जर श्रीमंत असाल तर तुम्ही कदाचित म्हणाल, 'होय, मी खूप पैसे गोळा केलेला आहे व तसं करण्यात मला खूप सुख मिळालं आहे?' किंवा तुमच्याकडे जर एखादी विशिष्ट प्रतिभा असेल, तर ती प्रतिभा धर्मशील जीवनासाठी धोकादायक असते. उपजत प्रतिभा ही देणगी असते, एक क्षमता, एका विशिष्ट दिशेने असलेली योग्यता जे विशेष ज्ञान असतं. विशेषज्ञ बनणं ही एक विखंडनाची प्रक्रिया आहे. म्हणून तुम्ही स्वतःलाच विचारलं पाहिजे की, तुम्ही तुमचं जीवन वाया घालवत आहात का? तुम्ही श्रीमंत असाल, तुमच्याकडे सर्व प्रकारच्या क्षमता असतील. तुम्ही एक विशेषज्ञ असाल, एक महान शास्त्रज्ञ किंवा एक व्यापारी असाल, परंतु तुमच्या जीवनाच्या शेवटी हे सर्व व्यर्थ ठरतं का?

*मुंबई १० फेब्रुवारी १९८५; 'तुम्ही जेथे आहात तेथे ती कृपा आहे'*

## तेव्हा नातेसंबंध हे व्यवहार होतात

जगभर माणसाचं कमीअधिक प्रमाणात अधःपतन चालू आहे. लैंगिक सुख, स्वतःचच खरं ठरवण्याचं सुख, उत्तेजित होण्याचं सुख, स्वतः मध्येच रस घेण्याचं सुख, प्रतिष्ठा आणि सत्तेचं सुख, सतत स्वतःच्या सुखाची पूर्ती करण्याची मागणी - हे सर्व वैयक्तिक किंवा सामूहिक सुख जेव्हा आयुष्यातील महत्त्वाचं लक्ष्य ठरतं तेव्हा तिथे अधःपतन असतं. जेव्हा मानवी संबंध वरवरचे, सुखावर आधारित असतात तेव्हा अधःपतन असतं. जेव्हा जबाबदारीला काहीही अर्थ राहत नाही, जेव्हा इतरांची किंवा पृथ्वीची, सागरातील वस्तुंची पर्वा राहत नाही, तेव्हा पृथ्वी व स्वर्ग ह्यांचा हा अनादर अधःपतनाचा दुसरा प्रकार असतो, जेव्हा उच्च स्थानावर ढोंगीपणा असतो, धंद्यामध्ये अप्रामाणिकता असते, जेव्हा असत्य हे रोजच्या बोलण्याचा भाग असतं, जेव्हा थोड्या लोकांची हुकूमशाही चालते, जेव्हा फक्त 'वस्तू' महत्वाचं स्थान घेतात तेव्हा समग्र जीवनाशी बेईमानी असते. मग ठार मारणं ही जीवनाची एकच भाषा उरते. जेव्हा सुख हे प्रेम समजलं जातं तेव्हा माणसं जीवनाच्या सौंदर्यापासून, पावित्र्यापासून स्वतःला तोडून टाकतात.

जितकं सुख मोठं तितकी 'मी'ची ताकद मोठी. जेव्हा सुखाचा पाठलाग असतो तेव्हा माणसं एकमेकांचं शोषण करत असतात. जेव्हा आपल्या आयुष्यात सुख महत्त्वाचं होतं तेव्हा नातेसंबंध हे व्यवहार होतात. तृप्तीची उत्कट इच्छा ही सुखावर आधारित असते, आणि जेव्हा ते सुख नाकारलं जातं किंवा ते व्यक्त करण्याचं साधन मिळत नाही तेव्हा तिथे राग, उपेक्षा, द्वेष, कडवटपणा असतो. सुखाचा अखंड पाठलाग हा खरोखर वेडेपणा, विवेकशून्यता आहे.

*'शाळांना लिहिलेली पत्रे - जीवनाची निरंतर वाटचाल हेच शिकणे'*
*प्रकरण २८*

## ऐंद्रिय मूल्यांचा परिपाक

माणसाभवती ऐंद्रिय (sensate) सुखांचा विळखा का बरं पडला आहे? ...आजच्या घडीला हा ज्वलंत प्रश्न झाला आहे कारण आधुनिक समाजात ऐंद्रिय संवेदना (senses) हरप्रकारे उद्दीपित केल्या जातात. वृत्तपत्रं, सिनेमा, मासिकं ही श्रृंगारिकतेनं भरून वाहतात. तुमचं लक्ष आकर्षून घेण्यासाठी जाहिरातींमधून स्त्रीची छबी वापरली जाते. बाह्य व आंतरिक उत्तेजनेला खतपाणी घातलं जात आहे, अथकपणे जोपासलं जात आहे. सांप्रत समाज हा मुळातूनच ऐंद्रिय मूल्यांचा परिपाक आहे. वस्तू, सत्ताबळ, सामाजिक स्थान, आपल्या नावाचं वजन, आर्थिक पतप्रतिष्ठा या गोष्टींना कमालीचं महत्त्व प्राप्त झालं आहे. ऐंद्रिय मूल्यांनी आपल्या आयुष्यांत प्रबळ स्थान पटकावलं आहे. ...तुमची आयुष्यं पोकळ आहेत, सुनी आहेत, नुसता परिपाठ आहे तो - पैसे कमावणं, पत्ते खेळणं, चित्रपट पहाणं, पुस्तकं वाचणं.

*मुंबई, १५ फेब्रुवारी १९४८; 'द कलेक्टेड वर्क्स', खंड चौथा*

## उथळ मनाच्या क्रियाकलापाबद्दल जागरूकता

स्वतःला लाभलेल्या क्षमता वा देणग्यांमधे तुम्ही बंदिस्त झाला आहात. माणसाचे हे मित्र धोकेबाज असतात बरं. ही साधनंच (means) मग साध्य (ends) होऊन जातात, आणि पुष्कळ दुःखाला, विषादाला कारणीभूत ठरतात. तुमचा पोषाख, तुमचा आहार, तुमच्या अंगस्थिती

(postures), तुमचा सुखोपभोग तुम्हाला ग्लानी आणत आहे, निस्तेज बनवत आहे; तुमचं मन असंवेदनशील होत चाललं आहे, तुमची आकलनशक्ती क्षीण, बोथट होते आहे... जर तुम्ही पृष्ठीय, उथळ मनाच्या क्रियाकलापाबद्दल जागरूकता झालात – जर तुम्ही त्याची वटवट, त्याची नाचानाची पाहिलीत; त्याच्या कारणमीमांसा, निष्कर्षांकडे पाहिलंत, तर त्या सजगतेतून शांतता, सुस्पष्टता येते.

*'द वर्ल्ड विदिन', प्रकरण ७५*

### सजगतेतून सुव्यवस्था

...त्यामुळे आत्म-ज्ञान महत्त्वाचं. स्वतःला समजून घेतल्याविना जगात सुव्यवस्था निर्माण होणं अशक्य आहे. स्वतःमधील विचार, भावना व कृतीच्या समग्र प्रक्रियेचा मागोवा घेतल्याशिवाय जगास शांतता, सुव्यवस्था, सुरक्षितता लाभणं केवळ अशक्य आहे. म्हणून तर स्वतःचा अभ्यास करणं आत्यंतिक महत्त्वाचं आहे, ते पलायन नव्हे. स्वतःचं अध्ययन करणं म्हणजे केवळ निष्क्रियता नव्हे, उलटपक्षी तो करताना आपल्या ठायी विलक्षण सजगता असावी लागते – निवाडा न करणारी, निंदारहित, दोषारोपणमुक्त सजगता. दैनंदिन आयुष्य जगताना 'स्व'च्या संपूर्ण प्रक्रियेचं येणारं भान हे संकुचित नसून त्याची व्याप्ती सतत वाढत जाते, त्यामुळे उत्तरोत्तर स्पष्टता येत जाते, आणि याच सजगतेतून सुव्यवस्था येते. प्रथम आपल्याच अंतःकरणात, व नंतर बाह्यत्करणात, आपल्या नातेसंबंधांमध्ये सुव्यवस्था येते.

*पुणे, १९ सप्टेंबर १९४८; 'द कलेक्टेड वर्क्स', खंड पाचवा*

### दुःखाच्या कारणाचा तपास करण्याचा क्षण

तुम्ही पीडित नसाल, तुम्ही संघर्षात नसाल, तुम्हाला कोणतीही समस्या भेडसावत नसेल, जीवनात कोणताही उत्पात घडला नसेल तर सांगण्या-बोलण्यासारखं फार काही नसतं, याचाच अर्थ तुम्ही निद्राधीन असता! – अशावेळी जगण्यानं आधी तुम्हाला खडबडून जागं केलं पाहिजे. पण जेव्हा तुम्ही दुःखाने तडफडू लागता तेव्हा सामान्यतः काय घडतं? तुम्ही ताबडतोब दुःखाचं शमन करू पाहता, त्यावर इलाज शोधू लागता. अशारितीने स्वस्थतेचा शोध घेताघेता तुम्ही आपल्याच करणीने स्वतःला झोपेच्या आधीन करता. ...मनाला जेव्हा धक्का बसतो, खडबडून जाग येते ; ज्याला तुम्ही 'दुःख' समजता, तो खरंतर दुःखाच्या कारणाचा तपास करण्याचा क्षण असतो – आराम पडावा यासाठी न चाचपडता.

*मॉन्टेव्हिडेओ, २६ जून १९३५; 'द कलेक्टेड वर्क्स', खंड दुसरा*

### ते सतत तुमच्या दारावर थाप देतं

घराची खिडक्यादारं बंद करून घेतल्याने, घरात राहिल्याने तुम्हाला सुरक्षित, निर्धास्त वाटतं – कुणाचाही जाच नाही, उपद्रव नाही. पण आयुष्य तसं नसतं. ते सतत तुमच्या दारावर थाप देतं, वारंवार तुमच्या खिडक्यांची कवाडं सताड उघडण्याचा प्रयत्न करतं जेणेकरून तुमची दृष्टी विस्तारू शकेल. तुम्ही घाबरल्याने, भीतीपोटी खिडक्या घट्ट लावून घेतल्याने दारावरची टकटक थांबत नाही, तिचा आवाज वाढत जातो. बाह्य सुरक्षिततांना जितके कवटाळाल तितकं जगणं तुम्हाला हिसके देतं, धक्के देतं.

*वाराणसी, १६ डिसेंबर १९५२; 'द कलेक्टेड वर्क्स', खंड सातवा*

### तरी तुम्ही बदलत नाही

आता काय घडलं म्हणजे तुमच्यात बदल घडून येईल? महासंकट? मोठा आघात? अतीव दुःख? न आटणारे अश्रू? यापैकी काहीही घडायचं शिल्लक नाही – आपत्तींमागून आपत्ती आल्या नि गेल्या. तुम्ही रात्रंदिवस अखंड टिपं गाळलीत. काहीही घडलं तरी तुम्ही बदलत नाही कारण अन्य कुणीतरी हे काम करेल या भरवशावर तुम्ही आहात... 'मी शोध घेईन, चिकित्सा करेन' असं कोणीच म्हणत नाही, कोणीच आपणहून पुढाकार घेत नाही.

*मद्रास, २९ डिसेंबर १९७९; 'द सीड ऑफ अ मिलियन इयर्स'*

### कारण तो तर जीवनाचा पाया आहे

आपण सारे मानव एक आहोत. ही पृथ्वी आपली आहे, सर्वांची मिळून आहे आणि प्रेमाने तिची काळजी घेतली तर ती आपल्या सर्वांसाठी अन्न, वस्त्र व निवारा देईल. म्हणून केवळ काही परीक्षा उत्तीर्ण होण्यापुरती तुमची तयारी करावी एवढंच शिक्षणाचं कार्य नसून, जीवनाची संपूर्ण समस्या समजण्यास मदत करणं हेही त्याचं कार्य आहे....ईश्वर म्हणजे काय हे शोधून काढणं ही सुद्धा आपली समस्या आहे, कारण तो तर जीवनाचा पाया आहे. योग्य पाया असल्याशिवाय घर फार काळ उभं राहू शकत नाही आणि आपण जर ईश्वर किंवा सत्य काय आहे त्याचा शोध घेत नसलो तर मानवाने धूर्तपणे लावलेले सर्व शोध अर्थहीन होतील.

*या गोष्टींचा विचार करा, प्रकरण २६*

### मानवाचं खरं कार्य काय आहे

या साऱ्या उद्योगातून नाश व विपत्ती, गोंधळ आणि नैराश्य हीच वाट्यास येतात हे तुम्हांला उघड दिसू शकतं. कमालीच्या दारिद्र्याच्या अगदी शेजारी मोठी चैनीची साधनं आहेत; रोगराईच्या व उपासमारीच्या जवळच फ्रिज व जेट विमानं अस्तित्वात आहेत. हे सारं मानवाचंच कार्य आहे आणि हे सारं पाहून, 'हे एवढंच त्याचं कार्य आहे काय? मानवाचं यापेक्षा अन्य काहीच खरं कार्य नाही की काय?' असा प्रश्न तुम्ही स्वतःला विचारीत नाही का? मानवाचं खरं कार्य काय आहे हे जर तुम्हांला शोधून काढता आलं तर जेट विमानं, कपडे धुण्याची यंत्रं, पूल, वसतिगृहं यांना अगदी वेगळा अर्थ प्राप्त होईल; पण मानवाचं खरं कार्य काय ते कळल्याशिवाय केवळ सुधारणांमध्ये लक्ष घालणं, मानवाने जे आधीच केलेलं आहे त्याचा फक्त आकार बदलणं या गोष्टींनी काहीही साध्य होणार नाही.

मग मानवाचं खरं कार्य कोणतं? मानवाचं खरं कार्य आहे सत्याचा, ईश्वराचा शोध घेणं, प्रेम करणं, स्वतःला कोंडून टाकणाऱ्या स्वार्थी उद्योगात न अडकणं. सत्य काय आहे त्याच्या खुद्द शोधातच प्रेम असतं आणि त्या प्रेमाने, माणसामाणसांत येणाऱ्या संबंधांत असणाऱ्या प्रेमानेच नवी संस्कृती, नवं जग निर्माण होईल.

*'या गोष्टींचा विचार करा', प्रकरण १७*

### हे मनोरंजन नसतं

रोबो म्हणजेच यंत्रमानवाचा तांत्रिक उत्कर्ष होईल तसतसे माणसाचे श्रम कमी होतील, कदाचित त्याला दिवसांतील दोनच तास काम पडेल. नजीकच्या भविष्यात कदाचित हे चित्र प्रत्यक्षात येईल. तेव्हा मानव काय करेल? ...तो मनोरंजनात दंग होईल, विरंगुळ्याच्या अगणित खिडक्यांमधून डोकावत राहील? की तो अंतर्मुख होईल? – हे मनोरंजन नसतं. याकरता अवलोकनाची, परीक्षणाची, अ-व्यक्तिगत बोधनाची मोठी क्षमता असावी लागते... तर, अशा या दोन शक्यता संभवतात.

*२१ जुलै १९८१; 'द नेटवर्क ऑफ थॉट'*

*(पृष्ठ ८ वर...*

...पृष्ठ ७ वरून)

## 'स्व' च्या प्रांताचा हा प्रवास

प्रसन्नता, आमोद ही स्वतःतच साध्यं (ends) नव्हेत; धैर्य व आशेप्रमाणेच आनंदाचे प्रसंगदेखील स्वतःतच सफल असलेल्या गोष्टीच्या शोधात असतात. अगदी नेटाने, धीराने आपण अशा साफल्याचा शोध घेतला पाहिजे, ते गवसलं तरच आपल्या विव्हलतेचा, आपल्या वेदनेचा अंत होईल. त्या आविष्कृतीचा प्रवास हा आपणा स्वतः मधून घडतो; अन्य सारे प्रवास हे आपल्याला विचलित करतात, आपल्याला अविवेकडे, भ्रामकतेकडे नेतात. 'स्व' च्या प्रांताचा हा प्रवास केला जावा तो काही साध्य करण्यासाठी नव्हे; संघर्षाचं, दुःखाचं निराकरण व्हावं म्हणूनदेखील नव्हे; हा प्रवास, हा शोध हीच आराधना असते, प्रेरणा असते.

*ओहाय, १७ जून १९४५; 'द कलेक्टेड वर्क्स', खंड चौथा*

## सर्वोच्च मूल्य

सत्याचा, वास्तवाचा शोध घेताना रोजीरोटीची व्यवस्था होईल; मात्र केवळ रोजीरोटीच्याच पाठी लागलो तर तीदेखील नष्ट होईल. उदरभरण हे सर्वोच्च मूल्य नव्हे. आपण त्याला सर्वोच्च मानू लागतो तेव्हा हाहाकार माजतो; खूनखराबा, उपासमार घडते.

अशाश्वताद्वारे शाश्वताचा शोध घ्यावा. तिथवर जाण्याचा रस्ता नाही, मार्ग नाही, कारण ते सदैव उपस्थित असतंच.

*'द वर्ल्ड विदिन', प्रकरण ७६*

## कड्याच्या टोकावर असताना

तुम्ही स्वयंप्रकाशी व्हायला हवं... हाताने वा मनाने साकारलेल्या गोष्टींत फारसा हाशील नाही. आपण पळवाट काढत नाही आहोत. कड्याच्या टोकावर असताना केलेल्या कोणत्याही कृतीने पाय घसरणार, कडेलोटच होणार याकडे आपण निर्देश करत आहोत. कड्यापासून दूर गेलो तरच आनंद, सुरक्षा लाभेल. ज्या थोड्याबहुत लोकांच्या हे ध्यानात आलं असेल त्यांनी या खाईपासून दूर, दूरवर प्रबुद्धतेची बेटं निर्माण करावीत. होय, वर्तमान संकटातून, सर्व मानवी समस्यांतून बाहेर पडण्याला मार्ग आहे - ही पळवाट नव्हे, ही वाट जाते अमृत-आनंदाकडे.

*मद्रास, २२ ऑक्टोबर १९४७; 'द कलेक्टेड वर्क्स', खंड चौथा*

**www.kfimumbai.org**

**मराठी, गुजराथी आणि इंग्रजी भाषांमधील संकेतस्थळ**

फाउंडेशनच्या इंग्रजी, मराठी आणि गुजराथी प्रकाशनांबद्दल माहिती, तसेच मराठी व गुजराथी पुस्तके जगभरातील सर्व देशांमधून विकत घेण्याची सोय.

वाचकांना आंतरजालावर आपल्या मातृभाषेत कृष्णमूर्तींच्या जीवनदृष्टीचा वेध घेण्याची ही एक विशेष संधी आहे.

- जे. कृष्णमूर्तींची इंग्रजी, मराठी आणि गुजराथी पुस्तके आणि ब्रेल आवृत्त्या विकत घेण्याची सोय
- फाउंडेशनच्या शाळा, अध्ययन केंद्रे इ. बद्दल माहिती
- मराठी (अंतरलहरी) आणि गुजराथी (अंतरमेळ) ह्या वृत्तपत्रिका
- कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीमधील काही विषयवार उतारे

**कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस्:**

www.jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.rishivalley.org
www.rajghatbesantschool.org
www.kfistudy.org
www.kscskfi.com
www.jkrishnamurtionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org
www.kfimumbai.org

जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:**

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड,
चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : ०४४ २४९३ ७८०३/७५९६
ई-मेल : info@kfionline.org
वेबसाईट : www.kfionline.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र:**

हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत.
संपर्क :- कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
मुंबई एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल,
मुंबई-४००००६.
दूरध्वनी: ०२२ २३६३३८५६/८९२८४ ७०९५०
ई-मेल : kfimumbai@gmail.com

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*

*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Mumbai Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 / 89284 70950 • Email : kfimumbai@gmail.com
Websites : kfimumbai.org, kfionline.org, jkrishnamurti.org

*Printed and Published by SHRI P V DABHOLKAR on behalf of KRISHNAMURTI FOUNDATION INDIA, MUMBAI EXECUTIVE COMMITTEE, HIMMAT NIWAS, 31, DONGERSEY ROAD, MALABAR HILL, MUMBAI 400 006. Editor : SMT. VASANTI PADTE*
*Printed at INDIA PRINTING WORKS, 42, G. D. AMBEKAR MARG, WADALA, MUMBAI 400 031.*